<u>नियमीत फौजदारी खटला क्र.४१/२०१९</u>
<u>निशाणी क्र.३८</u>

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. (०१)
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

| | |
|---|---|
| माझे नांव | :– शफी अब्दुल रहीम शेख, |
| माझे वय | :– ३२ वर्ष, |
| माझा व्यवसाय | :– मजुरी, |
| माझा रहिवास | :– मस्तानपुरा, पुर्णा, ता.पुर्णा, जि. परभणी. |

**<u>सरतपास</u>**

<u>अभियोगपक्षा करिता श्री.पी.एन.सोळंके, विशेष सहाय्यक सरकारी वकील</u>

०१. घटना पाच ते सहा वर्षां पूर्वी गुरुबुध्द महाविद्यालयात सकाळी १०:०० वाजता घडली. त्यावेळी मी महाविद्यालयात असताना विद्यार्थांनी भांडण करण्यास सुरुवात केली. याव्यतीरिक् काही घडले नाही. मला कोणी मारहाण केली ते मला सांगता येणार नाही. त्यावेळी मला कोणीतरी ढकलल्याने पडलो व त्यामुळे माझ्या डोक्याच्या उजव्या चाळ्यावर मार लागला. त्यामुळे मी रागाच्या भरात पोलीस ठाणे पूर्णा येथे फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. असे काही घडले नाही की, दिनांक १९/०९/२०१८ रोजी सकाळी ११:०० वाजता मी गज वाकवुन रिंग तयार करीत असताना आरोपी तेथे आले व त्यांनी लाथ मारुन मला खाली पाडले व आरोपी क्र.२ ने फायटरने उजव्या चाळ्यावर मारुन दुखापत केली तसेच लाथाबुक्याने मारहाण करुन शिवीगाळ केली.

**<u>(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदारास फितूर घोषित करुन त्याला उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली... सबब ती देण्यात आली.)</u>**

०२. हे खरे नाही की, दिनांक १९/०९/२०१८ रोजी सकाळी ११:००

वाजता मी गज वाकवुन रिंग तयार करीत असताना आरोपी तेथे आले व त्यांनी लाथ मारुन मला खाली पाडले व आरोपी क्र.२ ने फायटरने उजव्या चाळ्यावर मारुन दुखापत केली तसेच लाथाबुक्याने मारहाण करुन शिवीगाळ केली. आता मला फिर्यादमधील अधोरेखांकीत भाग अ वाचुन दाखवला. सदरचा मजकुर मी पोलीसांना सांगीतला नव्हता, सदरचा मजकुर पोलीसांनी माझ्या फिर्यादमध्ये का लिहीला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे खरे आहे की, आरोपींसोबत आपसात तडजोड झाली आहे. हे खरे नाही की, आरोपींना वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

... सरतपास पुर्ण.

**उलटतपास**

आरोपींकरीता श्री.आर.एन.मुथा वकील यांनी उलटतपास नाकारला.

**... फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

(**व्ही.आर.गटकळ**)

दिनांक:१०/०८/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.०२, पुर्णा.